श्रीकांत वि.आनंद

निशाणी क्र.

## फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये आरोपीचा जबाब

**आरोपीचे नाव–** **आनंद प्रफल्ल दुर्वे**

**वय – ५३ वर्षे , व्यवसाय – व्यवसाय**

**रा. शॉप नं.१ व ८ तसेच प्लॅट नं.२ए, २०२ अशोक अस्टोरिया ॲमेनीटी बिल्डींग, गोवर्धन व्हीलेज, गंगापूर रोड, नाशिक ४२२२२२.**

**प्र.क्र.१.** मी तुम्हाला माहिती देतो की, आता मी तुम्हाला प्रश्न विचारणार आहे, त्या प्रश्नांचे उत्तर देणे तुमच्यावर कायदेशिररित्या बंधनकारक नाही. तुम्ही त्या प्रश्नांचे उत्तर देणे नाकारु शकता. जर तुम्ही प्रश्नांचे उत्तर देणे नाकारले किंवा खोटे उत्तर दिले तर तुम्ही शिक्षेस पात्र राहणार नाहीत. तुमच्या गुन्ह्यात सामील करणारे वाक्य सुनावनीमध्ये विचारात घेण्यात येईल. हे तुम्हाला समजले काय ?

**उत्तर –** होय

**प्र.क्र.२.** साक्षीदार क्र.१ श्रीकांत पुरोहित (फिर्यादी) निशाणी क्र.५वर यांच्या साक्षीपुराव्यामध्ये असे आहे की, तुम्ही आणि फिर्यादी एकमेकांचे चांगले मित्र आहात, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

**उत्तर –** मित्र आहोत

**प्र.क्र.३.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, कारण तुम्ही दोघेही ऑगस्ट २००१ ते २००४ या काळात 'ओम कोटक लाइफ इन्शुरन्स', पुणे येथे एकत्र काम करत होते, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

**उत्तर –** होय

**प्र.क्र.४.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, तुम्ही दोघांनीही २००४ च्या सुमारास ती नोकरी सोडली आणि त्यानंतर तुमचा एकमेकांशी संपर्क राहिला नाही, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

**उत्तर –** खोटे

**प्र.क्र.५.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, त्यानंतर, २०१८ च्या सुमारास अचानक तुम्ही फिर्यादीशी संपर्क साधून त्यांना सांगितले की, 'तुम्ही सर्जिकल आणि डायग्नोस्टिक

साहित्याचा (वैद्यकीय व निदानविषयक साहित्याचा) व्यवसाय सुरू केला असून नाशिक आणि पुणे जिल्ह्यातील रुग्णालये व डॉक्टरांना या साहित्याचा पुरवठा करता', असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.६. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, या व्यवसायासाठी तुम्हाला काही निधीची आवश्यकता होती, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – होय

प्र.क्र.७. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, म्हणून तुम्ही फिर्यादी यांना त्या व्यवसायात काही रक्कम गुंतवण्याची विनंती केली आणि गुंतवलेल्या रकमेवर चांगला परतावा मिळवून देण्याचे आश्वासन दिले, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.८. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, फिर्यादी यांना तुमचा व्यवसाय आणि व्यवसायाचा प्रस्ताव आकर्षक व फायदेशीर वाटला, त्यामुळे त्यांनी भागीदारीचा प्रस्ताव मांडला, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – हा त्यांचा personal निर्णय होता

प्र.क्र.९. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, काही कारणास्तव तुम्ही आणि फिर्यादी यांच्यामध्ये भागीदारी होऊ शकली नाही, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.१०. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, म्हणून त्यांनी केवळ एक गुंतवणूकदार म्हणून पैसे गुंतवण्याचे मान्य केले, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.११. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, त्यानंतर, २०१९ मध्ये फिर्यादी यांनी तुम्हाला विविध धनादेशांद्वारे एकूण ४,४०,०००/– दिले, याची तुम्हाला पूर्ण कल्पना आहे, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.१२. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, त्यानंतर, तुमच्या सांगण्यावरून फिर्यादीने येस बँकेकडून ८,००,०००/– रुपयांचे वैयक्तिक कर्ज घेतले, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.१३. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे त्यापैकी त्यांना प्रत्यक्षात ७,६८,८४५/– रुपयेच मिळाले, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – माहित नाही

प्र.क्र.१४. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, त्यांनी वैयक्तिक कर्जाच्या रकमेतून काही रक्कम वजा केल्यानंतर तुम्हाला एकूण १०,०४,८४५/– रुपये दिले, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – होय

प्र.क्र.१५. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे त्यानंतर तुम्ही फिर्यादी यांना काही अंशतः रक्कम परत केली, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.१६. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे असे आहे की, तुम्ही येस बँककडे काही महिने हप्ते सुध्दा भरले, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.१७. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे जसजसा काळ लोटला, तसतसे फिर्यादी यांच्या लक्षात आले की तुमच्या त्या व्यवसायात कोणताही नफा नाही आणि शेवटी त्यांचे केवळ नुकसानच होणार आहे, म्हणून त्यांनी तुमच्याकडील बाकी रकमेच्या परताव्याची मागणी केली, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.१८. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे त्यानंतर अनेक पत्रव्यवहार आणि वादविवादानंतर, शेवटी तुमचे आणि फिर्यादी यांचेमध्ये तडजोड झाली, असे आले आहे,

याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

**प्र.क्र.१९.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे असे आहे की, अंतिम समझोत्यापोटी तुम्ही २,६६,०००/– रुपये देण्याचे मान्य केले आणि त्यांना निशाणी क्र.३१ वरील दिनांक ०३/०५/२०२२ रोजीचे पत्र दिले, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – हा धनादेश माझ्याकडून जबरदस्तीने देण्यात आलाय.

**प्र.क्र.२०.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे असे आहे की, निशाणी क्र.३१ वरील दिनांक ०३/०५/२०२२ रोजीच्या पत्रावर तुमची सही आहे, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – हे पत्र धनादेशासोबत देण्यास मला प्रेशर करण्यात आले.

**प्र.क्र.२१.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, त्या पत्रासोबतच तुम्ही निशाणी क्र.३२ वरील टीजेएसबी बँक लिमिटेड महात्मा नगर शाखा, नाशिक येथील रक्कम रु. २,६६,०००/– चा दिनांक ३०/०६/२०२२ रोजीचा धनादेश क्रमांक ००१०८० पोस्ट–डेटेड चेक' (भविष्यातील तारखेचा धनादेश) फिर्यादी यांच्या नावे त्यांना सुपूर्द केले होते, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – हा चेक केवळ security म्हणून देण्यात आला होता.

**प्र.क्र.२२.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे निशाणीक्र.३२ वरील धनादेशवर तुमची सही आहे, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – होय

**प्र.क्र.२३.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे निशाणीक्र.३२ वरील धनादेश त्याच्या देय तारखेला वटवला जाईल अशी खात्री तुम्ही त्यांना खात्री दिली होती, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

**प्र.क्र.२४.** साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे असे आहे की,फिर्यादीने तुम्ही दिलेला निशाणी क्र.३२ दिलेला धनादेश बँकेत भरला असता तो अपुरा निधी या कारणास्तव

अनादर झाला, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे.

प्र.क्र.२५. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये, निशाणी क्र.३२ वरील धनादेश न वटताच फिर्यादीस निशाणी क्र.३३ वरील रिटर्न मेमोद्वारे परत मिळाले, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.२६. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, निशाणी क्र.३२ वरील धनादेश न वटल्याचा निशाणी क्र.३३ वरील मेमो मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत फिर्यादीने तुम्हास निशाणी क्र.३६ अन्वये दिनांक २७/०९/२०२२ रोजी कायदेशीर नोटीस नोंदणीकृत पोस्टाद्वारे पाठवून निशाणी क्र.३२ धनादेशाची रक्कम मागितली होती, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.२७. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, निशाणी क्र.३६ वरील नोटीस फिर्यादी यांनी तुम्हाला तुमचे दोन पत्त्यांवर निशाणी क्र.३७ व ३७ब वरील पोस्टाच्या पावत्यांद्वारे पाठवले होते, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.२८. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे तुम्हाला निशाणी क्र.३६ वरील नोटीस मिळून सुध्दा कायदेशीर कालावधीत फिर्यादी यांना देय असलेली रक्कम दिली नाही, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.२९. साक्षीदार क्र.१ यांच्या साक्षीपुराव्यामध्ये पुढे, त्यामुळे तुम्ही निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टचे कलम १३८ अन्वये गुन्हा केलात, असे आले आहे, याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे ?

उत्तर – खोटे

प्र.क्र.३०. वरील साक्षीदार तुमच्याविरुद्ध का साक्ष देतात ?

उत्तर – वरील धनादेश माझ्याकडून बळजबरीने घेण्यात आलेला आहे.

श्रीकांत वि.आनंद
निशाणी क्र.

प्र.क्र.३१ तुम्हाला शपथेवर काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर – मी फिर्यादीचे कायदेशीर कुठलेही देणे लागत नाही.

प्र.क्र.३२. तुम्हाला तुमचे बचावात साक्षीदार तपासावयाचे आहे काय ?

उत्तर – होय. मला स्वतःला साक्षीदार म्हणून व माझे बँक स्टेटमेंट तपासायचे आहेत.

प्र.क्र.३३. तुम्हाला या खटल्याबाबत अजून काही सांगावयाचे आहे काय ?

उत्तर – फिर्यादींनी मला दिलेल्या रकमेपेक्षा जास्त रक्कम मी फिर्यादींना बँकेतून परत केलेली आहे. त्यामुळे माझे फिर्यादीला कुठलेही कायदेशीर देणे लागत नाही. फिर्यादीने स्वतः माझ्या घरी नाशिकला येवून घरी आरडाओरडा आणि प्रेशर करून चेक देण्यास भाग पाडले. हा धनादेश केवळ security म्हणून देण्यात आला होता. फिर्यादीने त्याचा गैरवापर करून केस केली आहे.

Sham

-------------

(आरोपीची सही)

(यो.सु.कवडे)

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

लष्कर न्यायालय, पुणे.

(यो.सु.कवडे) 148126
(यो.सु.कवडे)
न्यायदंडाधिकारी प्र.व.
लष्कर न्यायालय, पुणे.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की आरोपीने वरील जबाब माझ्यासमक्ष दिला व तो त्याचे सांगण्यानुसार नोंदविण्यात आला व त्यांना त्यांचे मातृभाषेत समजावून सांगण्यात आला.

148126

(यो.सु.कवडे)

दिनांक १२/०८/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

लष्कर न्यायालय, पुणे.